**प्रेसनोट** दिनांक ०५/०९/२०२४

# देहुरोड पोलीस स्टेशन कडुन वाहनचोरी करणारे ०२ आरोपी अटक करून त्यांचेकडुन १४,४५,०००/- रुपये किंमतीच्या २१ मोटारसायकली जप्त करून एकुण मोटार वाहन चोरीचे २१ गुन्हे उघड

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालया अंतर्गत मोटार सायकल चोरीचे वाढते प्रमाण लक्षात घेता **मा. पोलीस आयुक्त सो, श्री. विनयकुमार चौबे** यांनी पोलीस स्टेशन हद्दीतील मोटार सायकल चोरीच्या गुन्ह्याना आळा घालण्यासाठी प्रभावीपणे उपाययोजना राबविणे व गुन्हे उघडकीस आणणे बाबत आदेशीत केले होते.

त्याअनुषंगाने देहुरोड पोलीस स्टेशनचे तपास पथकाला काही इसम चोरीची दुचाकी देहुरोड बाजार परीसरात स्वामी चौक येथे घेवुन येणार आहे अशी बातमी मिळाली त्या बातमीच्या अनुषंगाने सदर ठिकाणी सापळा लावला असता बातमी प्रमाणे दोन इसम एका दूचाकी ज्युपीटर स्कुटर याच्यावरुन आले त्यांना तपास पथकांच्या अंमलदारानी शिताफीने ताब्यात घेतले त्यांचे नाव १) **आकाश शंकर जाधव, वय- २४ वर्ष, रा.टॉवर लाईन, चिखली, मु.पत्ता. कोळसुर,ता. उमरगा, जि.उस्मानाबाद** २) **आशुतोष नानासाहेब घोडके, वय- २३ वर्ष रा. गुरदत्त हौ.सोसायटी, त्रिवेणीनगर, टॉवलाईन ,चिखली** प्रमाणे असुन त्यांच्या ताब्यात मिळुन आलेली दु-चाकी मोटार स्कुटी बाबत अधिक तपास केला असता सदरची मोटार स्कुटी ही **देहूरोड पोलीस स्टेशन गुरनं. ३४७/२०२४ कलम ३०३(२) भारतीय न्याय संहीता** या गुन्ह्यातील चोरीस गेल्याचे असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना नमुद गुन्ह्यात दिनांक २७/०८/२०२४ रोजी अटक केले. त्यांची अधिक पोलीस कोठडी रिमांड प्राप्त करुन त्यांच्याकडे अधिक कौशल्याने तपास केला असता त्यांनी देहुरोड पोलीस स्टेशन हद्दीव्यतीरिक्त पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयांतर्गत विविध पोलीस स्टेशन्च्या हद्दीमध्ये अनेक मोटार सायकली चोरी केल्याचे कबुल केल्याने देहूरोड पोलीस ठाण्याचे तपास पथक यांनी वरिष्ठांच्या परवानगीने नागझरी, ता. जि.बीड येथुन तपास करून चोरी केलेल्या **२१ मोटर सायकली** त्यांची एकुण १४,४५,०००/- रुपये **किंमतीच्या जप्त करून करून खालील २१ मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकिस आणले आहेत.**

| | |
|---|---|
| १) देहूरोड पो.स्टे.गुरनं. ३४७/२०२४ बीएनएस कलम ३०३(२) | १२) भोसरी एमआयडीसी पोस्टेगुरनं.१५७/२४ भादंविक ३७९ |
| २) देहूरोड पो.स्टे.गु.रजि.नं.३९०/२०२४ बीएनएस क. ३०३(२) | १३) निगडी पो.स्टे. गु.र.नं.३२८/२०२४ भादंवि कलम ३७९ |
| ३) चिखली पोस्टेगुरनं.२८९/२०२४ भादंवि कलम ३७९ | १४) निगडी पोस्टेगुरनं.२७६/२०२४ भादंवि कलम ३७९ |
| ४) चिखली पोस्टेगुरनं.२४४/२०२४ भादंवि कलम ३७९ | १५) निगडी पो.स्टे.गु.र.नं.११५/२०२४ भादंवि कलम ३७९ |
| ५) चिखली पोस्टेगुरनं.३१४/२०२४ भादंवि कलम ३७९ | १६) निगडी पो.स्टे.गु.र.नं.३८७/२०२४ बीएनएस क ३०३(२) |
| ६) चिखली पो.स्टे.गु.र.नं.१८५/२०२४ भादंवि कलम ३७९ | १७) भोसरी पोस्टेगुरनं.२५७/२०२४ भादंवि कलम ३७९ |
| ७) चिखली पो.स्टे.गु.र.नं.५०६/२०२४ भादंवि कलम ३७९ | १८) भोसरी पो.स्टे.गु.र.नं.२०५/२०२४ भा.दं.वि. कलम ३७९ |
| ८) चिखली पोस्टेगुरनं.१७४/२०२४ भादंवि कलम ३७९ | १९) दिघी पो.स्टे.गु.र.नं.१०३/२०२४ भादंवि कलम ३७९ |
| ९) चिखली पोस्टेगुरनं.४५०/२०२४ बी.एन.एस. कलम ३०३(२) | २०) चिंचवड पोस्टे गुरन २९२/२०२४ बी.एन.एस.क ३०३(२) |
| १०) भोसरी एमआयडीसी पोस्टेगुरनं.२४६/२०२४ भादंविक ३७९ | २१) सिंहगड पोस्टे गु.र.नं.४४७/२०२४बीएनएस क ३०३(२) |
| ११) भोसरी एमआयडीसी पोस्टेगुरनं.३७०/२०२४ बीएनएसक ३०३(२) | |

नमुद आरोपी दिनांक ०५/०९/२०२४ रोजी पर्यंत पोलीस कोठडीत असुन त्यांची अधिक पोलीस कोठडी रिमांड प्राप्त करून देहूरोड पोलीस अधिक तपास करीत आहेत.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त सो, श्री. विनयकुमार चौबे सो, मा.पोलीस सह आयुक्त श्री. शशीकांत महावरकर सो, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी सो, मा. पोलीस उपायुक्त परिमंडळ–२ श्री. विशाल गायकवाड सो, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, देहुरोड विभाग श्री. देवीदास घेवारे सो. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विजय वाघमारे यांच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनाखाली पोनि गुन्हे विजयकुमार वाकसे, तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक सोहन धोत्रे, पोलीस उपनिरीक्षक अजयकुमार राठोड, पोलीस अंमलदार बाळासाहेब विधाते, सुनिल यादव, प्रशांत माळी, केतन कानगुडे, संतोष महाडीक, युवराज माने, शुभम बावनकर, कैलास उल्हारे, खंडु विरणक, मंगेश लोखंडे यांनी सदरची उल्लेखनीय कामगिरी केली आहे

**(विशाल गायकवाड)**
**पोलीस उप-आयुक्त,**
**परिमंडळ-२,पिंपरी-चिंचवड.**